वाचलेः-१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय,भोसरी यांच्याकडील पत्र क्र.माविभो/०१/कावि/३६२/२०२४ दि.१९/०६/२०२४
४) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि.२७/०६/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/४१३/२०२४
दि.२७/०६/२०२४

विषय –नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.
**श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक" संगणक क्र.८५८५**

आदेश,

**श्री.भगत राजू हरी** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **"विशेष शिक्षक"** या पदावर **दि.०९/०६/२००३** रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक"** यांच्या मुळ सेवानोंद पुस्तकानुसार त्यांची जन्म तारीख **दि.३०/०६/१९६६** अशी असून त्यांच्या वयास दिनांक २९/०६/२०२४ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक "** यांना **दि.३०/०६/२०२४** रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे वश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

**श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक "** यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक "** यांचे कडून महानगरपालिकेस नवीन घर कर्ज,घरबांधणीकर्ज, घरदूरूस्ती कर्ज भुखंड खरेदी ,घरविस्तार कर्ज, वाहनकर्ज, संगणक कर्ज ,वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक "** यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना सेवासात्यत देण्यात आलेले नाही.

सबब,मी सहाय्यक आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक" यांना दिनांक - ३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद **श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक"** यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.भगत राजू हरी "विशेष शिक्षक"

माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रतः- १) लेखा शाखा

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. ४

४) माध्यमिक विद्यालय भोसरी

२/- पुढील कार्यवाहीसाठी

(राजीव घुले)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.